दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे

नविननिश्चल देवाजी येनोरकर (विदर्भ आवृत्ती कार्यकारी संपादक)

लक्ष्मण फकिरबा कांबळे (आवृत्ती संपादक) , किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)




छत्रपती संभाजीनगर || वर्ष २ रे || अंक २३० || सोमवार ०५ ऑगस्ट २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

# ढाणकी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालयांमध्ये श्रेणी वर्धन करा.!

**प्रहारची जिल्हा शेल्यचिकिस्तकाकडे मागणी**

दैनिक सूर्योदय

निरंजन नलगे ढाणकी



ढाणकी येथील आरोग्य केंद्रात रुग्णांना कुठल्याच प्रकारचे आरोग्य विषयक चांगल्या सुविधा उपलब्ध नसल्याने येथे येणाऱ्या गोरगरीब रुग्णांचे प्रचंड हाल होत असल्याने सामान्य गोरगरीब रुग्ण त्रस्त झाले आहे. अनेक वेळा प्राथमिक आरोग्य केंद्रात औषध साठ्याचा तुटवडा निर्माण होत असल्याने रुग्णांना खाजगी मेडिकल वरून औषधी आणावी लागतात. त्यामुळे त्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो. प्राथमिक आरोग्य केंद्रात गोळ्या औषधे तज्ञ डॉक्टर ,औषधी संयोजक यांचा अभाव असल्याने सामान्य रुग्णांना नाहकत्रास सहन करावा लागत आहे. सध्या सर्दी, खोकला, ताप या आजाराने डोके वर काढले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात साथीचे रोग आजार, संसर्गजन्य आजारावर औषध उपचार केला जातो तसेच बाह्य रुग्ण विभागात सर्दी ,खोकला ,ताप या आजारावर तपासून औषध दिले जाते. पण चांगली आरोग्यविषयक सोयी सुविधा मिळत नसल्यामुळे खाजगी दवाखान्यात रुग्णांना उपचारासाठी जावे लागत आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णवाहिका नादुरुस्त असल्याने लसीकरण करण्यास अडचणी निर्माण होत आहे. नवीन इमारतीत स्थलांतरित होऊन ही अनेक महिन्यांपासून एकही प्रस्तुती होऊन शकली नाही. कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया सुद्धा झाली नाही.त्यामुळे रुग्णांची हेडसांड होत आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रातील अनेक पदे रिक्त आहेत आरोग्य सेवक, आरोग्य सेविका ,औषधी संयोजक ,नेत्र चिकिस्त, रुग्णवाहिका चालक हि अनेक महत्त्वाची पदे रिक्त आहेत. त्यामुळे इथे असलेल्या कर्मचाऱ्यांवर ताण वाढत आहे. आज रोजी ढाणकी शहराला निगडित असलेले प्राथमिक आरोग्य केंद्रावर ६५ हजार लोकसंख्येचा भर असून सभोवतालच्या परिसरातील नागरिकांचा दररोज आरोग्य संबंधित काम करिता संपर्क येत असतो. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रात दररोज २०० ते ३०० रुग्णांची तपासणी होते. रुग्णांना सदर आरोग्य केंद्रात रुग्णसेवा मिळत नसल्याने त्यांना उमरखेड, यवतमाळ, नांदेड या ठिकाणी तपासणी करण्याकरता जावे लागते. तेव्हा आजची लोकसंख्या तसेच शेजारील गावांची लोकसंख्या व रोजचा जनसंपर्क व रुग्णांची संख्या लक्षात घेता तात्काळ ढाणकी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची ३० खाटांचा ग्रामीण रुग्णालयांमध्ये श्रेणी वर्धन करावे या करिता जिल्हा शैल्य चिकित्सक यवतमाळ यांना प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने निवेदन देऊन मागणी करण्यात आली. यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुका प्रमुख सय्यद माजीद उपतालुकाप्रमुख गोपाल झाडे, उमरखेड शहर प्रमुख राहुल मोहितवार,उमरखेड शहर सचिव श्याम चेके ,उमरखेड शहर सहसचिव अभिजीत गंदेवार ,आदि प्रहार जनशक्ती पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

**अन्यथा आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागेल –तालुका प्रमुख सय्यद माजीद ढाणकी येथील आरोग्य केंद्राचे ३० घाटांचे ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणी वर्धन करण्यासाठी तात्काळ प्रशासनाने व संबंधित विभागाने पावले उचलावी अन्यथा येत्या काही दिवसात आमरण उपोषणास बसेल असा इशारा प्रहार जनशक्ती पक्षाचे उमरखेड तालुका प्रमुख सय्यद माजिद यांनी सदर निवेदनातून दिला आहे.**

# मराठवाडा सामाजिक फाऊंडेशन सेलू तालुका आढावा बैठक व नवीन पदाधिकारी नियुक्ती संपन्न

सेलू रोहित झोल



सेलू येथील शासकीय विश्रामगृहामध्ये मराठवाडा सामाजिक फाऊंडेशन सेलू तालुका आढावा बैठक व नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीपत्र देऊन नियुक्त्या करण्यात आल्या. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. संजय दादा रोडगे साहेब अध्यक्ष श्रीराम प्रतिष्ठान सेलू तथा संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती सेलू तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून मराठवाडा सामाजिक फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मा.श्री. आबासाहेब टरपले साहेब हे लाभले होते.मराठवाडा सामाजिक फाउंडेशनचे प्रदेशाध्यक्ष मा. श्री. डी एस कातारे पाटील, प्रदेश कार्याध्यक्ष मा. श्री. शिवाजीराव बल्लाळ, प्रदेश सचिव मा. श्री. पंडितरावजी बोराडे पाटील, प्रदेश संघटक मा. श्री. महादेवराव गायके, मंठा तालुका सचिव मा. श्री. भगवानराव गायकवाड, ओंकारेश्वर गांजवे, परभणीचे पदाधिकारी बाबा कातकडे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते सेलू तालुका उपाध्यक्षपदी त्र्यंबक पितळे यांची तर सेलू तालुक्यातील सर्कल प्रमुख म्हणून चिकलठाणा सर्कल प्रमुख मा. श्री. गोविंदराव शिंदे, देऊळगाव गात सर्कल प्रमुख मा.श्री. हनुमान माने, रवळगाव सर्कल प्रमुख मा.श्री. परमेश्वर चौरे, कुपटा सर्कल प्रमुख मा.श्री. गणेश किटाळे व रवळगाव उपसर्कल प्रमुख मा. श्री. शिवाजीराव सरोदे, देऊळगाव गात उपसर्कल प्रमुख मा. श्री. नागेश काळे या कार्यकर्त्यांना नियुक्तीपत्र देऊन निवड करण्यात आली.कार्यक्रमाला दामोधर (बापू) दळवे, आबासाहेब मोगल, सरपंच सुदाम (अण्णा) रोकडे, एकनाथ कारके, संतोष कारके, सरपंच दीपक रोडगे, ज्ञानेश्वर चौरे, संजय गटकळ, परमेश्वर गाते आदीसह सेलू तालुक्यातील मराठवाडा सामाजिक फाउंडेशनचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम प्रसंगी मराठवाडा सामाजिक फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मा श्री आबासाहेब टरपले साहेब यांनी उपस्थितांना मराठवाडा सामाजिक फाउंडेशन संदर्भात घडून आलेल्या विविध प्रासंगिक घडामोडी बद्दल व कामकाजाबद्दल मार्गदर्शन केले तर मा. श्री. डॉ. संजय दादा रोडगे साहेब अध्यक्ष श्रीराम प्रतिष्ठान सेलू तथा संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती सेलू यांच्या अध्यक्षीय मार्गदर्शनपर मनोगताने समारोप झाला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मराठवाडा सामाजिक फाउंडेशन सेलूचे तालुकाध्यक्ष लिंबाजीराव कलाल, तालुका सचिव विठ्ठलराव काळे, तालुका उपाध्यक्ष परमेश्वर राऊत, तालुका संघटक सोमेश्वरराव गिराम आदीसह पदाधिकारी व सदस्यांनी उपस्थित होते

# महाराष्ट्रात १६९ कुटूंबांच्या हातात सत्ता आहे-ॲड.प्रकाश आंबेडकर

नांदेड(प्रतिनिधी)-महाराष्ट्रात सत्ता १६९ कुटूंबांच्या हातात आहे. पाहा खासदार, आमदार, सभापती, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, विविध समित्यांचे अध्यक्ष हे सर्व एकमेकांचे नातेवाईक आहेत. एकदा नातेवाईकांची सत्ता संपली की सर्वसामान्य माणसांची सत्ता येण्यास सुरूवात होते असे प्रतिपादन वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख ॲड.प्रकाश आंबेडकर यांनी केले.काल दि.२ ऑगस्ट रोजी नांदेडच्या नवा मोंढा मैदानात आरक्षण बचाव यात्रेची सभा झाली. या सभेत बोलतांना ॲड.आंबेडकर म्हणाले की, तुम्हाला अर्थात सर्वसामान्य माणसाला सत्ता मिळण्यास सुरूवात झाली की, मग तो नागरीकांच्या समस्येंवर काम करण्यासाठी तयार होतो. तो लोकांचे प्रश्न सोडवितो. जोपर्यंत सर्व ओबीसी समाज एकजुट दाखवणार नाही. तो पर्यंत यश येणार नाही. त्यासाठी येत्या ७ ऑगस्ट रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या आरक्षण बचाव यात्रेचा समारोप समारंभात राज्यातील सर्व ओबीसी समाजांनी एकजुट दाखवावी आणि आम्ही एकत्र लढा देणार आहोत असा संदेश द्यावा. आज गावा-गावात ओबीसी विरुध्द मराठा असे गट तयार झाले आहेत. त्या गटांमध्ये भांडणे, दंगली घडविण्याचे प्रयत्न होतील पण त्यात तुम्ही पडू नका आणि दंगलीची चितावणी देणाऱ्यांना सांगा छत्रपती शिवाजी महाराज पहिल्यांदा तुझ्या घरात जन्म घेवू दे अर्थात तुझ्या मुला-मुलींना पहिली दंगल घडवू दे मग आम्ही त्यांच्या पाठीशी राहु असे सांगा.

ओबीस आरक्षण आता धोक्यात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने २२५ समाजाचे आमदार आणणार अशी घोषणा केली. त्यात ५६ आमदार आरक्षणाची वाढतील उर्वरीत थोडेसेच राहतात ते सर्व मिळून विधानसभेत जनगणनेची घोषणा करतील. जनगणना पुर्ण होईपर्यंत ओबीसी आरक्षणाला स्थगिती देतील आणि हाच मोठा खेळ ते करणार आहेत. कारण विधानसभेत झालेल्या निर्णयाविरुध्द आपण काही करू शकणार नाही. न्यायालयात सुध्दा दाद मागता येणार नाही. यासाठी मनोज जरांगे पाटलाने २८८ जागा लढविण्याचा केलेला निर्धार पुर्ण करावा असे आवाहन मी त्यांना करतो. ज्या दिवशी जरांगे पाटलांनी आपली घोषणा केली त्याच वेळेस ओबीसी आणि मराठा या दोघांना न्याय मिळणारच. ही लढाई शरद पवार विरुध्द जरांगे पाटील म्हणजे श्रीमंत आणि गरीब मराठा यांच्यात आहे. म्हणून सर्वांनी गरीब मराठ्यांच्या मागे उभे राहायला हवे. या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी एकच जालीम उपाय आहे आणि तो म्हणजे १०० ओबीसी आमदार निवडुण आणा असे ॲड.प्रकाश आंबेडकर म्हणाले. या सभेत ओबीसी समाजातील अनेक समाजांचे प्रमुख उपस्थिती होते. त्यांनी सुध्दा आपले विचार व्यक्त केले.

# राज्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू

नांदेड(प्रतिनिधी)-सन २००५ मध्ये शासकीय सेवेत रुजू झालेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू केल्याचे आदेश शासन निर्णयाद्वारे निर्गमित करण्यात आले आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाचे कार्यासन अधिकारी अविनाश जाधव यांची या शासन निर्णयावर डिजिटल स्वाक्षरी आहे.




१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर शासकीय सेवेत रुजू झालेल्या शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आली होती. त्यामुळे २००५पुर्वीचे अधिकारी आणि कर्मचारी आणि त्यानंतरचे यामध्ये मोठा फरक झाला.डॉ.कैलास वसराम राठोड यांनी या प्रकरणाला एक वेळ पर्याय या सदरात पाठपुरावा केला. याशिवाय राज्यभर अधिकारी व कर्मचारी वेळोवेळी वेगवेगळी आंदोलने करत होते.

या सर्वांना अनुसरून महाराष्ट्र राज्यातील १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर सेवेत रुजू झालेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी महाराष्ट्र सर्व साधारण भविष्य निर्वाह निधी नियम १९९८ व अनुशंगीक नियमांच्या तरतुदी महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८४ मधील तरतुदी लागू करण्यात आल्या आहेत. या नवीन तरतुदीमुळे भविष्य निर्वाह निधी(जीपीएफ) खाते तात्काळ उघडण्यात यावे. तसेच राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (एनपीएस) मधील खाते बंद करून त्यातील कर्मचाऱ्यांच्या हिशाची देय रक्कम व्याजासह नवीन भविष्यनिर्वाह निधी खात्यात जमा करावी असे आदेश या शासन निर्णयात दिले आहेत. राज्य शासनाने हा शासन निर्णय संकेतांक क्रमांक २०२४०७०५१११६४६९२१७ प्रमाणे राज्याच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केला आहे.

संपादकीय

## आनंदाचं झाड

मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरात सुख-दुःखाचे, आनंदाचे, शौर्यातीत पराक्रमाचे लहान-मोठे असे प्रसंग वारंवार घडत असतात. वर्षाचे तीन ऋतू, बारा महिने आणि अधिक मास यामधले जीवनचक्र गतिमान होते, ते जगण्याच्या धावपळीत अन्नधान्य, निवारा शोधण्यासाठी बाहेर पडलेल्या मुंबईकरांमुळे. एक पाय घरात आणि एक पाय बाहेर असलेल्या प्रत्येकावर कसली ना कसली टांगती तलवार असते. संध्याकाळ होईस्तोवर आपला माणूस व्यवस्थित घरी यायला हवा, ही घरच्यांना लागून राहिलेली चिंता माणसाला स्वस्थ बसू देत नाही. सदान्-कदा प्रश्नांच्या गर्तेत अडकलेल्यांना मानसिक, शारीरिक प्रकारच्या ताणांना सामोर जावे लागते. ताण निर्माण करणाऱ्या बऱ्याचशा गोष्टी आपल्या आसपास घडत असतात. त्यातली पहिली गोष्ट म्हणजे सतत बदलत असलेली आपली जीवनशैली. मानवी जीवन क्षणभंगुर असल्याने, सुखाच्या हव्यासापोटी दैनंदिन जीवनातल्या गरजांसाठी आपण आपला आनंद आणि सुखी जीवन दुःखाच्या अथांग सागरात लोटतो. मनुष्याच्या जगण्याच्या विविध तऱ्हा असल्याने, त्यानुसार तो त्याच्या पद्धतीने जीवनाचा आनंद घेतो. या आनंदात आहार, विहार, निद्रा यांवर परिणाम होऊन समतोल मात्र बिघडतो.

पाऊस, पाणी, प्रदूषण, रोगराई, आजार, कडक उन्हाळा या विषयांवर 'मुंबईचे आरोग्य धोक्यात' या मथळ्याखाली एक बातमी कानावर आली. त्यानिमित्तानेच पार पडलेल्या एका डॉक्टरी सभेच्या आयोजनात मला हजर राहण्याचा योग आला. आनंदीत राहा आणि दीर्घायुषी व्हा या विषयावरील परिसंवादात मनाला आणि एकूणच शरीराला चकटफू आरोग्य मंत्र मिळताच, आनंदाच्या गुरुकिल्लीची गोष्ट आठवत माझे विचारचक्र सुरू झाले.

तसं तर, जगातली निम्म्याहून अधिक माणसे मनावर ओझे घेऊन जगतात. अहो स्मितहास्य तर सोडाचं, पण रस्त्यावर भेटलेल्या ओळखीच्या माणसाची ओळख आठवेपर्यंत आपण ती विसरतो! हे असं होत बघा! मंडळी मनुष्य ज्यामुळे जास्त आनंदी होतो, त्यात सुधारणा झाली, तर आनंदी आनंद चोहीकडे पसरेल. या आनंद लहरी तरंगत येतील हवेतून. त्यावेळी ज्यांच्या जाणिवा-जागृती कार्यक्षम असतील, त्यावेळी त्यांना आनंदाची कमतरता भासणार नाही. दुःखाचे डोंगर आडवे आले, तरी हर्षल वायू लहरी वाहतील. आनंदाच्या झऱ्याचा उगम आपल्या अंतःकरणात असतो. तो ज्याला कळतो, त्याच्या आयुष्याचे सोने होते. बाबा आमटे यांच्या आनंदवनाची संकल्पना ही दीनदुबळ्यांच्या सेवेसाठी आनंदाची पायमल्ली ठरलीयं. समाजातले अनेक घटक, सामाजिक संस्था, समाजसेवक आपल्यापरीने आनंदाचे साम्राज्य पसरवण्यासाठी हातात हात घालून उभे आहेत. त्यांच्या वाट्याला दुःखद प्रसंग आले असतीलच! त्यातून तावून सुलाखून निघाल्यावरचं त्यांचे कार्य जगासमोर आल असणार. म्हटलं तर सत्यवचन ही आनंदाची खूण आहे.

विवेकी धोरणामुळे आनंदाला बळकटी प्राप्त होते. त्यासाठी दिलेला सहयोग चिरकाल आनंद देतो. आपल्याकडे म्हणजे समाजात आनंदाच्या व्याख्या व्यक्तीगणिक बदलतात. कधी कुणाला खाण्यात आनंद मिळतो. कुणाला देण्यात आनंद मिळतो, तर नवीन गोष्टी घेण्यात काही धन्यता मानतात. काही अवलियावीर अनोख्या अशा विक्रमाचे सरदार बनतात. शेजारच्या सुमन काकी पलीकडच्या दादरकर काकूंना बडबडण्यात तोंडसुख घेतात. मित्र रमेश सुरेशच्या चांगल्या गोष्टींना नाव ठेवण्यात वेळ दवडतो. बंड्याकडे सायकल जाऊन स्कूटर आलीयं, हा त्याचा आनंद तर गुर्जर काकांच्या बढतीसह बदलीचे आनंदी वारे वाहत आहेत, हा त्यांचा आनंद. आनंदाला जसे बांधून ठेवता येत नाही, तसेच तो कवेतही घेता येत नाही. क्षणभर आनंदासाठी लोकं आपला पैसा-वेळ खर्च करतात. दोन पैशाचा आणि बिन पैशाचा आनंद हा भाग अजून वेगळा असतो. आपल्या आनंदासाठी प्रयत्न करण्यापेक्षा दुसऱ्याला काय दिले तर सौख्य मिळेल, याचा विचार हवा.आपल्याकडच्या काही गोष्टी समोरच्याला दिल्याने शांतता अनुभवास येते. शिवाय त्यांच आयुष्य उजळून निघत हे विशेष. मंडळी आनंद असा सुगंध आहे की, तो दुसऱ्यावर शिंपित जाता स्वतःवरही शिंपला जातो. मग मस्त आहे ना, हा बिनखर्चाचा स्प्रे. म्हणजे बघा, आनंद शोधू जाता दडून बसतो, पकडू जाता निसटतो, आणि त्याच्यामागे धावू लागताचं हुलकावणी देतो, पण जर त्याला सहजपणे घ्यालं, तर सहज प्राप्त होतो. त्यासाठी थोरामोठ्यांची शिकवण वेळोवेळी उपयोगाला येते. आपल्याला बाळकडू पाजण्याचे काम त्यांच्याकडून वारंवार होते म्हणून तर समाजात आनंद नांदतो.

# बहिणीची छेड काढल्याचा जाब विचारणाऱ्या भावाला बेदम मारहाण, नेरळ येथील घटना, नेरळ पोलीस ठाण्यात दामत गावातील चार जणांविरोधात गुन्हा दाखल

जिल्हा प्रतिनिधी मंगेश यादव

नेरळ येथे सीएनजी पंपावर रिक्षात सीएनजी गॅस भरण्यासाठी एक तरुण गेला होता. तर रिक्षात असलेल्या आपल्या बहिणीला त्याने बाहेर उतरवले होते. मात्र ती तरुणी बाहेर उभी असताना त्याच पंपावर गॅस भरण्यासाठी आलेल्या इतर चार तरुणांनी तिची छेड काढली.

हा प्रकार भावाला समजल्यावर त्याने त्या तरुणांना जाब विचारला असता त्यांनी त्या भावाला बेदम मारहाण केली आहे. या प्रकरणानंतर संबंधित भावाने नेरळ पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. दरम्यान तक्रार दाखल होताच तात्काळ आरोपीना नेरळ पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. तर त्यातील एक आरोपी अल्पवयीन आहे.ङ्ग याबाबत मिळालेल्या माहितीनुसार फिर्यादी आकाश प्रकाश पाटील हा तरुण रिक्षा चालवतो. दिनांक २ ऑगस्ट रोजी या आकाश हा नेरळला सीएनजी गॅस भरण्यासाठी आला होता. तसेच यावेळी त्याची बहीण देखील सोबत होती. सीएनजी गॅस पंपावर वाहनात गॅस भरताना वाहन निर्मनुष्य असावे लागते. त्यामुळे आकाशने बहिणीला बाहेर उतरवून तो गॅस भरण्यासाठी वाहनांच्या रांगेत रिक्षा घेऊन थांबला. त्याचवेळी तिथे स्विफ्ट गाडीतून दामत गावातील मुझमिल मलिक बुबेरे, फरान नासिर नजे, रियाज मो.बिलाल शेख यासह एक अल्पवयीन मुलगा हे सुद्धा दाखल झाले होते. थोड्यावेळानंतर रिक्षात सीएनजी भरुन आकाश आल्यानंतर त्याला त्याची बहीण घाबरलेली दिसली. म्हणुन तिला काय झाले असे विचारले.









तेव्हा आपण बाहेर थांबलो असताना स्वीष्ट गाडीतुन चार जणांनी माझ्याकडे वाईट नजरेने पाहुन अश्लील इशारे केले असल्याचे तिने सांगितले. तेव्हा आकाशाला या गोष्टीचा राग येऊन त्याने तिथेच असलेल्या त्या चार जणांना याबाबत जाब विचारला. तेव्हा त्या चार जणांनी आकाशलाच हाताबुक्यानी बेदम मारहाण केली. तर त्यातील एका इसमाने त्याचे हातातील कड्याने आकाशच्या डोक्यात मारून डोक्यास गंभीर स्वरूपाची दुखापत करत पळ काढला. त्यामुळे जखमी झालेल्या आकाशने बहिणीसह नेरळ पोलीस ठाणे गाठत घडल्या प्रकारबाबत तक्रार दाखल केली. तर हा प्रकार बघता बघता संबंध परिसरात समजून नेरळ पोलीस ठाण्यात मोठा जमाव जमला. नुकत्याच झालेल्या उरण येथील यशश्री शिंदे हत्येच्या पार्श्वभूमीवर जमलेले नागरिक आक्रमक झाले.

तर नेरळ पोलिसांनी याबाबत भारतीय न्याय संहिता कलम ११८(२), ७९, ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करत तात्काळ आरोपीचा शोध सुरु केला. तर यानंतर मुझमिल मलिक बुबेरे, फरान नासिर नजे, रियाज मो.बिलाल शेख यांना पोलिसांनी अटक आज दिनांक ३ ऑगस्ट रोजी न्यायलयात हजर केले असता त्यांना ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. याबाबत नेरळ पोलीस ठाण्याचे सहाय्यक ङ्गपोलीस निरीक्षक शिवाजी ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक समीर लोंढे हे अधिक तपास करीत आहेत.

# रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याकडून रायगड जिल्हा ग्राहक सरंक्षण परिषदेवर अशासकीय सदस्यपदी सुधागड तालुक्यातील प्रशांत हिंगणे, गणेश भोईर, वनिता धामापूरकर यांची नियुक्ती

रायगड जिल्हा

उत्तर प्रतिनिधि/मंगेश यादव

रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याकडून रायगड जिल्हा ग्राहक सरंक्षण परिषदेवर अशासकीय सदस्यपदी सुधागड तालुक्यातील प्रशांत हिंगणे, गणेश भोईर, वनिता धामापूरकर यांची नुकतीच नियुक्ती झाल्याचे आदेश पत्राव्दारे जाहीर करण्यात आले आहे.

जिल्हा ग्राहक सरंक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांची मुदत दि.३१ ऑक्टोबर २०२१ संपली होती. त्यानुसार २८ अशासकीय सदस्य पदांसाठी जिल्हाधिकारी पुरवठा कार्यालयाकडून दि.६ ऑक्टोबर २०२२ जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. यावेळी ४८ अर्ज कार्यालयाकडे प्राप्त झाले होते. परंतु ४८ अर्जापैकी निवडीच्या निकषानुसार कोणताही अर्ज पात्र नसल्याने परत या कार्यालयाकडून दि. २६ डिसेंबर २०२३ रोजी फेर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती.



श्री.प्रशांत हिंगणे श्री.गणेश भोईर सौ.वनिता धामापूरकर

यावेळी महाराष्ट्र शासनाच्या अन्न, पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या शासन निर्णयामधील निर्देशानुसार जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी दि.२९ मार्च २०२४ रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली निवड समितीचे बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये १७ प्रस्तावाची निवड करून १७ अशासकीय सदस्यांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये सुधागड तालुक्यातील पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते प्रशांत हिंगणे, लोककल्याण ग्राहक संरक्षण संस्था सभासद गणेश भोईर, व्यावसायिक व सामाजिक कार्यकत्या वनिता धामापूरकर यांची निवड करण्यात आली होती.

महाराष्ट्र शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून ग्राहकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रत्येक जिल्हास्तरावर जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदे स्थापन करण्यात येते. प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद स्थापन करण्यात येते. जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेकडून ग्राहकांच्या प्रष्न, समस्या सोडविण्यात येतात. तसेच ग्राहकांचे मुलभुत अधिकार व हक्क यांचे संरक्षण करण्याचे कार्य केले जाते. ग्राहकांवरील अन्याय दूर करण्यासाठी प्रशासकीय अधिकारी व अशासकीय सदस्य यांच्या समितीव्दारे प्रयत्न, मार्गदर्शन केले जाते.

रायगड जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद या समितीमध्ये जिल्हाधिकारी रायगड - अध्यक्ष, अप्पर जिल्हाधिकारी रायगड - उपाध्यक्ष, जिल्हा पुरवठा अधिकारी रायगड सदस्य सचिव,तर सदस्य म्हणून पोलीस अधीक्षक रायगड, उप नियंत्रक - वैद्यमापन शास्त्र, उपकार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद रायगड, सहाय्यक आयुक्त - अन्न व औषध प्रशासन, कार्यकारी अभियंता - दूरसंचार विभाग रायगड, कार्यकारी अभियंता (महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी रायगड), जिल्हा कृषी अधीक्षक रायगड, आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद रायगड, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी रायगड, जिल्हा माहिती अधिकारी रायगड असे १३ प्रशासकीय अधिकारी आहेत. तर आता निवड झालेल्या अशासकीय सदस्यामध्ये ग्राहक संघटनांचे प्रतिनिधी १०, वैदयकीय व्यवसायिकांचे प्रतिनिधी १, व्यापार व उदयोग क्षेत्रांचे प्रतिनिधी २, पेट्रोल व गॅस विक्रेत्यांचे प्रतिनिधी १, शेतकरी प्रतिनिधी २ आहेत.

# श्री राज एज्युकेशन सेंटरच्या कर्मचाऱ्यांना अखेर दिलासा : पगार वाढ व सर्व सुट्ट्या मिळणार मनसे कामगार सेनेचे युनिट स्थापन

रायगड जिल्हा

उत्तर प्रतिनिधी/मंगेश यादव

सुधागड तालुक्यातील श्री राज एज्युकेशन सेंटरच्या कर्मचाऱ्यांना अखेर दिलासा मिळाला आहे. मनसेच्या माध्यमातून येथील शाळा व कॉलेजमध्ये कार्यरत सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, चालक व विविध विभागाचे कामगारांना न्याय मिळाला आहे. त्यांना पगार वाढ व सर्व सुट्ट्या मिळणार आहेत. त्या अनुषंगाने रविवारी (ता.२८) येथे मनसे कामगार सेनेचे युनिट स्थापन करण्यात आले आहे.

मनसे सुधागड तालुका अध्यक्षा हर्षदा शिंदे यांनी सांगितले की येथे कार्यरत असलेले हाऊस्किपर, शिक्षक, चालक व कामगार यांची कित्येक वर्षे पिळवणूक केली जात होती. पूर्ण दिवस काम करून हजेरी फक्त १६० ते २४० रुपये एवढीच दिली जात होती. मेडिकल इन्शुरन्स, वार्षिक सुट्टी न मिळणे अश्या इतर अडचणी देखील होत्या. घडणारा प्रकार या कर्मचाऱ्यांनी मनसे तालुका अध्यक्षा हर्षदा शिंदे यांना सांगितला. याची दखल घेऊन घेऊन हर्षदा शिंदे यांनी महाराष्ट्र सरचिटणीस स्नेहल जाधव, रायगड जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील, रायगड जिल्हा अध्यक्षा सपना



राऊत यांच्या माध्यमातून कामगार सेनेचे महाराष्ट्र सरचिटणीस गजानन राणे यांच्याशी संपर्क करून कामगारांना न्याय मिळून दिला. कामगारांनी महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेचे सभासत्व स्वीकारून रविवारी (ता.२८) येथे युनियन बोर्ड चे उदघाट करण्यात आले. या कार्यक्रमासाठी मनसे कामगार सेना महाराष्ट्र सरचिटणीस गजानन राणे, सरचिटणीस स्नेहल जाधव, कामगार सेना महाराष्ट्र उपाध्यक्ष अभिषेक दर्गे, सुधागड तालुका अध्यक्ष सुनील साठे, सुधागड तालुका सचिव सचिन झुंजारराव, सुधागड तालुका अध्यक्षा हर्षदा शिंदे व श्री राज एज्युकेशन सेंटर कॉलेज मधील महिला कामगार आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# लोक आता इतके वैतागले की त्यांना फक्त समझोता हवा; सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचुड यांची टिप्पणी

नवी दिल्ली – पर्यायी वाद निवारण यंत्रणा म्हणून लोक अदालतींच्या भूमिकेवर सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांनी आज प्रकाश टाकला. ते म्हणाले की लोक आज न्यायालयांच्या प्रकरणांना इतके वैतागले आहेत की त्यांना आता फक्त समझोता हवा आहे.प्रलंबित प्रकरणे किंवा सुरूवातीच्या टप्प्यातील प्रकरणांत लोक न्यायालयाच्या माध्यमातून सौहार्दपूर्ण पध्दतीने समझोता घडवून आणला जाऊ शकतो.लोक आता इतके कंटाळले आहेत की न्यायालयांच्या संदर्भात त्यांना कोणताही समझोता पाहिजे आहे. त्यांना फक्त न्यायालयापासून लांब राहण्याची इच्छा आहे. ही प्रक्रिया एक शिक्षा झाली आहे आणि आम्हा सर्व न्यायाधीशांसाठी हा चिंतेचा विषय आहे.



लोक न्यायालय स्थापन करण्याच्या प्रत्येक टप्प्यात आपल्याला बार आणि बेंच यांच्यासह सगळ्यांचा जबरदस्त पाठिंबा आणि सहकार्य मिळाले. जेंव्हा लोक अदालतीसाठी पॅनल तयार केले गेले तेंव्हा एक दक्षता घेतली गेली की प्रत्येक पॅनलमध्ये दोन न्यायाधीश आणि बारचे दोन सदस्य असतील.

सरन्यायाधीश म्हणाले की असे करण्यामागे उद्देश हा होता की ही अशी संस्था नाही की जी केवळ न्यायाधीशांनीच चालवावी आणि ही न्यायाधीशांची संस्था नाही तर प्रत्येक अधिवक्त्यालाही संस्थेवर अधिकार असावा.आपण परस्परांपासून खूप काही शिकतो. प्रक्रियेशी संबंधित लहान सहान गोष्टींवरही त्यांचे किती नियंत्रण असते हे आम्ही वकिलांकडून शिकतो. सर्वोच्च न्यायालय भलेही दिल्लीत असेल, मात्र ते केवळ दिल्लीचे नाही तर संपूर्ण देशाचे आहे.

ते म्हणाले की विशेष लोक न्यायालयांची सुरूवात केली तेंव्हा केवळ सात बेंच होते. त्याचे कारण आम्ही यशस्वी होऊ की नाही अशी शंका आम्हाला होती. मात्र गुरूवारपर्यंत आमच्याकडे १७ बेंच होते आणि भरपूर काम होते.लोक न्यायालयांचा उद्देश हा आहे की लोकांच्या घरापर्यंत न्याय पोहोचवणे आणि हे सुनिश्चित करणे की त्यांच्या जिवनात आम्ही कायमच उपस्थित आहोत. शनिवारी सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष लोक न्यायालयात सरन्यायाधीश बोलत होते.

# मिर्झा, चव्हाण, सुदामे, नाईक झाले वरिष्ठ अधिवक्ता हायकोर्टाने दिला दर्जा: शुक्रवारी निघाली अधिसूचना

मुंबई : मुंबई उच्च न्यायालयाने २८ वकिलांना वरिष्ठ वकील म्हणून नियुक्त केले. त्यात चार महिला वकिलांचा समावेश आहे. १८ जुलैपासून त्यांना दिलेले पदनाम लागू झाल्याचे उच्च न्यायालयाच्या परिपत्रकात म्हटले आहे. त्यात ॲडव्होकेट फिरदोस मिर्झा, सरकारी वकील देवेंद्र चव्हाण, ॲड. मोहन – सुदामे आणि अक्षय नाईक यांचाही समावेश आहे.



फिरदोस मिर्झा | देवेंद्र चव्हाण | मोहन सुदामे | अक्षय नाईक

इतर वकिलांची नावे अशी ॲड. मंजुळा राव, ॲड. अब्दुल माजिद मेनन, ॲड. सीमा सरनाईक, ॲड. हर्षद वसंतराव निंबाळकर, ॲड. दिलीप निवृत्ती पाटील, ॲड. क्लियोफाटो गॅरेट आल्मेडा कौटिन्हो, ॲड. सुदीप पासबोला, ॲड. रोहन शहा, ॲड. रवींद्रनाथ शेट्टी, ॲड. प्रशांत चव्हाण, ॲड. नीता कर्णिक, ॲड. कार्लोस अल्वारेस फरेरा, ॲड. नॉर्मा अल्वारेस, ॲड. संदेश पडियार, ॲड. झरीर भरुचा, ॲड. प्रशांत रमाकांतराव कातनेश्वरकर, ॲड. सुबोध देसाई, ॲड. देवीदास पंगम, ॲड. विनय सोनपाल, ॲड. सुरेल शहा, ॲड. सायरस अर्देशिर, ॲड. नौशाद इंजिनियर, ॲड. गौतम अनखड आणि ॲड. सिमिल पुरोहित.

# ॲड. दत्ता पाटील लॉ कॉलेजचे युवा महोत्सवात यश

अलिबाग प्रतिनिधी
राजेश बाष्टे,:

दि.१ऑगस्ट २०२४ रोजी मुंबई विद्यापीठ आयोजित ५७ व्या युवा महोत्सवातील रायगड दक्षिण विभाग जिल्हास्तरिय फेरीचे डॉ. श्री.नानासाहेब धर्माधिकारी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,कोलाड येथे आयोजन करण्यात आले होते. या युवा महोत्सवात रायगड दक्षिण विभागातील २५ महाविद्यालयातील ५०० विद्यार्थ्यांनी गायन,नृत्य,अभिनय ,वक्तृत्व,वादविवामूर्तीकला, मेहेंदी, चित्रकला इ.३२ कलाप्रकारांमध्ये सहभाग घेतला.ॲड. दत्ता पाटील लॉ कॉलेजमधील१४ विद्यार्थ्यांनी १७ कलाप्रकारांमध्ये सहभाग घेतला.या युवामहोत्सवात कु.श्रध्दा वैशंपायन या विद्यार्थीनीने सुगम संगीत गायन (प्रथम क्रमांक) आणि नाट्यसंगीत (द्वितीय क्रमांक) या स्पर्धांमध्ये यश प्राप्त करुन अभिमानास्पद कामगिरी बजावली. कु.सायली नागोठणेकर या विद्यार्थीनीने मेहेंदी स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त केला. तसेच वादविवाद (इंग्रजी) या स्पर्धेत कु.नवाल घोले आणि कु.आमिना कोंडविलकर या विद्यार्थिनींनी तृतीय क्रमांक प्राप्त केला.या सर्व विद्यार्थिनींची मुंबई विद्यापीठस्तरिय युवामहोत्सवसाठी निवड झाली आहे. जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील आणि उपाध्यक्ष डॉ..साक्षी पाटील तसेच महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य ॲड. नीलम हजारे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. युवा महोत्सवासाठी विद्यार्थ्यांची तयारी करून घेण्यासाठी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.निलम म्हात्रे,प्रा.पियुषा पाटील,प्रा.चिन्मय राणे,प्रा.कौशिक बोडस यांनी मार्गदर्शन केले.विद्यार्थी समन्वयक कु.आदित्य म्हात्रे,कु.आर्य पाटील आणि कु.विशाल पाटील यांनी संघाच्या पूर्वतयारीमध्ये हातभार लावला.







## हवाई सुंदरी बनली उद्योजिका

दी लेडी बॉस  अर्चना सोंडे

उत्तर प्रदेशातील बरेली या छोट्याशा शहरात लहानाची मोठी झालेली ती मुलगी आकाशातील विमान पाहून, इतर मुलांसारखी आनंदाने टाळ्या वाजवायची. पुढे तीच मुलगी विमानातील हवई सुंदरी बनते. दुर्दैवाने कोरोना काळात तिची नोकरी जाते. निराश झालेल्या याचिकाला आईची जुनी डायरी मिळते. त्या डायरीने तिच्या आयुष्याचा उद्योजिका म्हणून अध्याय लिहिला जातो. हा उद्योग अध्याय आहे–याचिका चोप्रा यांचा.

याचिका मध्यमवर्गीय कुटुंबात वाढली. तिने बरेली येथील बिशप कॉनरॅड सीनियर सेकेंडरी स्कूलमध्ये १० वी पर्यंत शिक्षण घेतले. तिचे कुटुंब १९९९ मध्ये पुण्यात आले. तिने हचिंग्ज हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला, जिथे तिने २००१ मध्ये १२ वी पूर्ण केली. त्यानंतर तिने वाडिया कॉलेजमधून बी कॉम केले. त्यानंतर एका नावाजलेल्या शैक्षणिक संस्थेतून तिने मानव संसाधन (एचआर) विषयात एमबीए केले. पुढे तिने पुण्यातील एका वित्तीय कंपनीच्या एचआर विभागात सुमारे एक वर्ष काम केले.

काही काळानंतर याचिकाला तिची नोकरी नापसंत वाटू लागली. सदर नोकरी कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीशी संबंधित होती. मात्र याचिकाला संप्रेषण आणि प्रशिक्षणाशी संबंधित काही तरी करण्यात स्वारस्य होते, जे एचआरमध्ये समाविष्ट होते; पण त्या तत्कालीन कंपनीमध्ये तिला करता येत नव्हते.

एके दिवशी २०११ मध्ये, भारतीय वाहतूक कंपनीमध्ये काम करणाऱ्या तिच्या मावशीने तिला एअर इंडियामध्ये हवाई सुंदरीच्या नोकरीसाठी मुलाखत देण्यास सांगितले. ती नोकरीसाठी एवढी काही उत्सुक नव्हती; पण एचआर नोकरीवर ती खूश नसल्यामुळे, तिच्या कुटुंबीयांनी तिला मुलाखतीस जायला सांगितले. दुर्दैवाने तिला एअर इंडियामध्ये नोकरी मिळाली नाही; परंतु तिला जेट एअरवेजमध्ये हवाई सुंदरी म्हणून नियुक्त करण्यात आले. तिथे तिने मुंबईत सुमारे एक वर्ष काम केले. २०११ मध्ये, ती दुबईमध्ये एमिरेट्समध्ये सामील झाली. ही नोकरी तिला खूप आवडली. आलिशान हॉटेल्समध्ये राहणे, लॉस एंजेलीस आणि दुबईदरम्यान फ्लाइटमध्ये प्रवास करणे ही तिची दैनंदिनी होती. अनेक सेलिब्रिटी आणि उद्योजकांना भेटणे सहज शक्य असायचे. हे आपल्या आयुष्यातील सर्वोत्तम क्षण होते, असे याचिकाला वाटते.

दरम्यान २०१९ मध्ये, तिने गोव्यात टूर आणि ट्रॅव्हल व्यवसाय चालवणाऱ्या रे वाझसोबत लग्न केले. २०१९च्या सरत्या वर्षात कोरोनाने जगभर थैमान घालण्यास सुरुवात केली. अवघ्या जगात लॉकडाऊन झाले. उद्योग डबघाईस आले. कित्येकांच्या नोकऱ्या गेल्या. पहिली कुऱ्हाड हवाई वाहतूक कर्मचाऱ्यांवर पडली. याचिका पण यातून सुटली नाही. ८ जुलै २०२० रोजी या महामारीच्या काळात तिला तिच्या नोकरीवरून काढून टाकण्यात आल्याची माहिती देणारा ई-मेल आला. त्यावेळी याचिका पतीसोबत गोव्यात राहत होती. ई-मेल वाचून तिला धक्काच बसला. आपल्याला नोकरीवरून काढून टाकण्यात आले, हे मान्य करायला तिला दोन-तीन दिवस लागले. या दुःखात अजून एक भर म्हणजे तिची आईसुद्धा निर्वतली. याचिका आतून पुरती तुटली होती. विश्रांती घेण्याची ही एक चांगली संधी आहे. असे सांगत याचिकाच्या पतीने तिला सावरण्याचा प्रयत्न केला. याच सुमारास गोव्यातील बारदेझ येथे घर साफ करत असताना, तिला तिच्या आईची जुनी डायरी सापडली, ज्यामध्ये लोणच्याच्या सर्व पाककृती होत्या. या पाककृतीचा वापर करत, तिने घरगुती लोणचे तयार केले.

तिच्या घरच्यांना लोणचे फार आवडले. आपण लोणच्याचा व्यवसाय सुरू केला तर तिच्या डोक्यात कल्पना आली. पतीने तिला प्रोत्साहन दिले. एप्रिल २०२१ मध्ये, गोव्यातील पर्वरी येथील तिच्या घरातून २०,००० रु. गुंतवून तिने लोणच्याचा व्यवसाय सुरू केला. तिने लोणच्यासाठी काही भांडी आणि साहित्य खरेदी करण्यासाठी हे पैसे गुंतवले आणि तिचे पहिले उत्पादन बनवले-मिरचीचे लोणचे. आपल्या ब्रँडला 'सीरका' असे नाव दिले. आज ती दर महिन्याला सुमारे १ लाख रुपये कमावते. याचिका घरूनच काम करते. सुरुवातीला याचिकाने इन्स्टाग्राम पेज सुरू केले आणि कुटुंबातील सदस्य आणि मित्रांना मोफत लोणचे देऊ केले. ''मला खात्री होती की, जर लोकांना ते आवडले, तर ते आणखी ऑर्डर करतील. ग्राहकांना आकर्षित करण्याची माझी रणनीती होती आणि ती कामी आली,'' याचिका सांगते. काही महिन्यांत विक्री हळूहळू वाढत गेली. लोक याचिकाच्या उपक्रमासाठी आणि चवदार लोणच्यासाठी तिचे कौतुक करत होते. शिवाय साहित्य खरेदी करण्यापासून ते बनवण्यापर्यंत आणि ऑर्डर पूर्ण करण्यासाठी ते पॅक करण्यापर्यंतच्या प्रत्येक कामाचा ती आनंद घेत होती. एका ग्राहक प्रदर्शनात तिला काही तासांत ६० जार विकण्यात यश आले, तेव्हा तिला मोठा ब्रेक मिळाला. हा तिच्यासाठी उत्साहवर्धक क्षण होता. त्यामुळे तिने लोणच्याच्या आणखी विविध प्रकारांवर प्रयोग करायला सुरुवात केली. याचिका आता आठ प्रकारचे लोणचे तयार करते. गाजर, मिरची, फ्लॉवर, वांगी, लसूण, आंबा, टोमॅटो आणि लिंबू. ते १०० ग्रॅम (१२५ रुपये किमतीचे) आणि २०० ग्रॅम (२७५ रुपये किमतीच्या) जारमध्ये येतात. ही सारी उत्पादने त्यांच्या वेबसाइटवर तसेच अमेझॉनवर उपलब्ध आहेत. पावसाळ्यात तिला अधिक ऑर्डर मिळतात. तिची उत्पादने सहा महिने ते एक वर्ष टिकू शकतात. सुरुवातीच्या काळात ग्राहक फोन आणि व्हॉट्सॲपद्वारे ऑर्डर देत असत. एक दिवस याचिकाच्या भावाने तिला कॉल केला की, त्याच्या एका सहकाऱ्याने ऑर्डर दिली नाही,

# कोकण, मध्य महाराष्ट्रावर कृपा; विदर्भात अवकृपा !

पुणे : राज्यामध्ये जून, जुलै महिन्यांत सरासरीहून अधिक पाऊस झाला आहे, तर येत्या दोन महिन्यांत विदर्भ, मराठवाडा, खान्देशात कमी पावसाचा अंदाज आहे. कोकण, मध्य महाराष्ट्रात सरासरी पाऊस पडेल, असा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने गुरुवारी दिला. ऑगस्ट महिन्यामध्ये देशामध्ये सरासरी पाऊस पडेल; परंतु देशातील काही भागांमध्ये सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता आहे, असाही अंदाज व्यक्त करण्यात आला. भारतीय हवामानशास्त्र विभागाचे महासंचालक मृत्युंजय मोहपात्रा यांनी



मान्सून हंगामाच्या दुसऱ्या टप्प्याचा आणि ऑगस्ट महिन्याचा अंदाज गुरुवारी जाहीर केला. ते म्हणाले, यंदा देशामध्ये जून आणि जुलै महिन्यात सरासरीहून अधिक पावसाची नोंद झाली.

पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा १.८ टक्के अधिक राहिले, तर दक्षिण भारतात सरासरीपेक्षा १८.४ टक्के पाऊस झाला. पूर्व आणि ईशान्य भारतामध्ये सरासरीपेक्षा १८.९ टक्के कमी पाऊस झाला, तसेच मध्य भारतात पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा १६.८ टक्क्यांनी जास्त होते. दक्षिण भारतात सरासरीपेक्षा २६.७ टक्क्यांनी अधिक पाऊस झाला.

या ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यामध्ये महाराष्ट्राच्या बहुतांश भागात सरासरी पाऊस पडण्याचा अंदाज आहे. हवामान विभागाने ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात देशात सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडण्याचा अंदाज जाहीर केला. देशाच्या बहुतांश भागात या दोन्ही महिन्यांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस राहील. मात्र, ईशान्य आणि शेजारच्या पूर्व भाग, लडाख, सौराष्ट्र आणि कच्छ तसेच मध्य भारताच्या काही भागात सरासरीपेक्षा कमी पाऊस राहील, असा अंदाज हवामान विभागाने दिला.

जुलै महिन्यात अधिक पाऊस

देशात जून ते जुलै महिन्यात सरासरी पाऊस ४४५.८ नोंदवला जातो. प्रत्यक्षात यंदा ४५३ मिमी पाऊस झाला आहे. १.८ टक्के अधिक पाऊस झाला.जून महिन्यात सरासरी १६५ मिमी पाऊस होतो. प्रत्यक्षात १४७ मिमी नोंदवला गेला. १० टक्के पाऊस कमी झाला.

जुलै महिन्यात सरासरी पाऊस २८० मिमी होतो, प्रत्यक्षात ३०५ मिमी पाऊस झाला असून, ९ टक्के अधिक आहे.

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
सोमवार ०५ ऑगस्ट २०२४



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## मुंडे महाविद्यालयात लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

मंडगणड (प्रतिनिधी) दि. : येथील सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाच्या लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या वतीने लोकमान्य टिळक पुण्यदिन व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. वाल्मिक परहर होते. यावेळी डॉ. भरतकुमार सोलापुरे, डॉ. धनपाल कांबळे, डॉ. महेश कुलकर्णी, प्रा. अशोक कंठाळे, श्री. युवराज बागडे, ग्रंथपाल डॉ. दगडू जगताप उपस्थत होते.



कार्यक्रमाच्या सुरूवातीला लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेला उपप्राचार्य डॉ. वाल्मिक परहर व श्री. युवराज बगाडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तत्पूर्वी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. विष्णू जायभाये यांनी उपस्थितांचे स्वागत करून आपल्या प्रस्ताविकात कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. ङ्गयावेळी बोलताना उपप्राचार्य डॉ. वाल्मिक परहर म्हणाले की, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील लोकमान्य टिळकांचे कार्य देशाला प्रेरणा देणारे होते. त्यांच्या कार्याने प्रभावित होऊन अनेक भारतीयांनी स्वातंत्र्य लढ्यात स्वतःला झोकून दिले.तसेच अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून सामान्य व वंचित समाजाला वाचा फोडली. कामगार चळवळीतील त्यांचा सहभाग उल्लेखनीय होता. ङ्गकार्यक्रमास सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. शेवटी उपस्थितांचे आभार डॉ. विष्णू जायभाये यांनी मानले.

## विकास कामे आणि प्रश्न मार्गी लावण्यासाठी बळीराज सेनेच्या वतीने संपर्क मोहीम जाहीर..! संपर्कप्रमुख शरदराव बोबले यांची माहिती

आबलोली (संदेश कदम)

२६४ विधानसभा संपर्कमुख शरदराव बोबले यांनी दिलेल्या माहितीनुसार गुहागर विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक वाडी व गावातील विकास कामे व तेथील स्थानिक प्रश्न मार्गी लागावेत यासाठी बळीराज सेनेच्या वतीने गुहागर, खेड व चिपळूण तालुक्यातील नागरिकांना संपर्क साधण्यासाठी पक्षाच्या वतीने मुंबई व स्थानिक पातळीवर संपर्क मोहीम राबविण्यात येत आहे यासाठी पक्षाच्या वतीने दर गुरुवार व शुक्रवार मुंबई पक्ष कार्यालयामध्ये सायंकाळी पाच ते सात या वेळेत पदाधिकारी उपलब्ध असतील पत्रकारांना दिलेल्या माहितीनुसार संपर्कप्रमुख शरदरावजी बोबले व सहसंपर्कप्रमुख संतोष निवाते यांनी विकास कामे जलद गतीने पूर्ण होण्यासाठी ही मोहीम हाती घेतली आहे या संपर्क मोहिमेचा फायदा मुंबई स्थानिक नागरिकांनी तसेच वाडी वस्त्यातील पदाधिकाऱ्यांनी निवेदनाद्वारे सादर करून घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे



याबाबत अधिक माहिती देताना संपर्कप्रमुख शरदराव बोबले यांनी सांगितले आहे की, २६४ गुहागर विधानसभा मतदारसंघात गुहागर तालुका व खेड तसेच चिपळूण तालुक्यातील काही गावे समाविष्ट आहेत वर्षानुवर्षे या गावांमध्ये अनेक कामे रखडलेली आहेत अशी प्रलंबित विकास कामे सरकारी पातळीवर तसेच प्रशासकीय पातळीवर मार्गस्थ व्हावी यासाठी बळीराज सेनेच्या वतीने संपर्क मोहीम राबवून ती पूर्ण करण्याचा मानस आहे यासाठी स्थानिक व मुंबई पातळीवरचे काही प्रमुख कार्यकर्ते काम करणार आहेत करिता संबंधित नागरिकांनी गावातील पदाधिकारी आणि प्रमुख कार्यकर्ते यांनी पक्ष कार्यालय मुंबई मुलुंड येथील कुणबी वसतीगृह ९० फीट रोड आंबेडकर नगर गॅलेक्सी हॉटेल जवळ मुलुंड पूर्व मुंबई येथे सायंकाळी दर गुरुवारी व शुक्रवारी पाच ते सात या वेळेत संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे

## लाल बहादूर शास्त्री हायस्कूल दहागाव मध्ये क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली.

दहागाव मंडणगड प्रतिनिधी

क्रांतिसिंह नाना पाटील सारखे योध्ये होणे नाही, भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या प्राणाची आहुती देणाऱ्या पैकी एक क्रांतिसिंह नाना पाटील होते. ते स्वातंत्र्य पूर्वी इंग्रजां विरुद्ध लढताना त्यांना खूप हालअपेष्टा सोसाव्या लागल्या.ते कित्येक वर्षे भूमिगत होते, त्यांच्या आईची शेवटची इच्छा त्यांना एक वेळ पहावी अशी होती, इग्रंजाचा पहारा ,मोठा बंदोबस्त असतानाही वेषांतर करून त्यांनी आपल्या आईचे अंत्यदर्शन,घेवून मुखाग्नी दिली. असे प्रतिपादन प्रशालेचे मुख्याध्यापक श्री आबासाहेब हुलगे यांनी केली.ते दिं. ३ रोजी मंडणगड तालुका विकास मंडळ संचलित लाल बहादूर शास्त्री हायस्कूल दहागाव येते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंती कार्यक्रमात बोलत होते. प्रारंभी सौ. विनया नाटेकर मॅडम यांनी प्रतिमेचे पूजन केले त्यानंतर विद्यार्थ्यांची भाषणे झाली. या कार्यक्रमास सौ. पालांडे मानसी , विक्रम शेले सर, गौतम माने सर, जितेंद्र कलमकर सर,कृष्णा दळवी, संजय गौड, महेंद्र गुडेकर विद्यार्थी पालक उपस्थित होते, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रमोद जाधव सर यांनी मानले.






## मोफत सिलिंडरचा लाभ हवाय? तर करा ई-केवायसी

*मुंबई : राज्यातील गरीब कुटुंबांना वार्षिक तीन गॅस सिलिंडर मोफत देणारी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना राज्य शासनाने जाहीर केली आहे. या योजनेच्या लाभासाठी लाभार्थींनी त्यांच्या संबंधित गॅस एजन्सीकडे जाऊन ई-केवायसी करावे लागणार आहे. तसेच लाभार्थ्यांचे बँक खाते आधार संलग्न करून घ्यावे लागणार आहे, तसे आवाहन अन्न व नागरी पुरवठा विभागाने केले आहे.*

*राज्यात मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना जाहीर करण्यात आली असून या योजनेंतर्गत प्रधानमंत्री उज्ज्वला योजना आणि मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना वार्षिक ३ गॅस सिलिंडरचे पुनर्भरण मोफत देण्यात येणार आहे.*

## श्रमजीवी फाउंडेशन मुंबई तर्फे तळा मराठी शाळेच्या विध्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

तळा कृष्णा भोसले.

श्रमजीवी फाऊंडेशन मुंबईच्या माध्यमातून गेली अठरा वर्षे शैक्षणिक, सामाजिक, सहकार आरोग्य अशा विविध क्षेत्रांत उत्तम कार्य सुरु आहे. ग्रामीण, दुर्गम भागातील आदिवासी, गरीब व गरजू विद्यार्थ्यांना श्रमजीवी फाउंडेशन मुंबई तर्फे शनिवार दिनांक ३ ऑगस्ट २०२४ रोजी रायगड जिल्हा परिषद शाळा तळा येथे शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.ङ्गयाप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री हरेश कावणकर, श्री सुरेश शिगवण, ज्येष्ठ सल्लागार रायगड भूषण श्री पुरुषोत्तम मुळे, शाळा समितीचे उपाध्यक्ष भास्कर गोळे, मुख्याध्यापिका सौ सुप्रिया जामकर, श्री सुनिल बैकर, वर्षा माडी, उषा गुरव, निकम सर, ॲड बोडखे, श्री वंदन सापळे, श्री वसंत गायकवाड, सुजाता थोरात, चेतना गोरीवले, प्रिया गायकवाड, श्री सुरेश शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.ङ्गग्रामीण भागातील युवकांचा विकास होण्यासाठी शिक्षण ही काळाची गरज आहे. त्यामुळे आदिवासी, गरिब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देऊन स्वतः सोबत राष्ट्राचा उत्कर्ष साधता आला पाहिजे. या मुख्य हेतूने गेली १८ वर्षे विविध क्षेत्रात ही संस्था कार्य करीत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी सुसंस्कृत व सक्षम व्हावी यासाठी ही संस्था कार्य करीत आहे. सर्व महापुरुषांचा आदर्श घेऊन आजचे विद्यार्थी घडले पाहिजे. ही मुलं लहान आहेत पण यांच्या पालकांनी या मुलांकडे लक्ष देऊन आपल्या शाळेचे नाव कसे उज्ज्वल करता येईल ते पहावे असे बहुमोल विचार संस्थेचे अध्यक्ष श्री हरेश कावणकर यांनी व्यक्त केले.ङ्गतर संस्थेचे ज्येष्ठ सल्लागार श्री पुरूषोत्तम मुळे यांनी संस्थेच्या गेल्या अठरा वर्षांच्या कार्याचा आढावा घेतला.ङ्ग श्रमजीवी फाउंडेशन तर्फे समाजात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान देखील वर्धापन दिनी केला जातो. संपूर्ण महाराष्ट्रातून विविध क्षेत्रातील मान्यवरांची निवड करून त्यांना गौरविण्यात येते. यावेळी आंबेळी आदिवासी वाडी, तारणे आदिवासी वाडी, तारणे प्राथमिक शाळा, तळे प्राथमिक शाळा या शाळेतील इयत्ता पहिली ते सातवी मधील जवळपास १५० गरजू, गरीब व आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. श्री हरेश गावणकर, श्री सुरेश शिगवण आणि श्रमजीवी परिवार या सर्वांचे श्री पुरुषोत्तम मुळे यांनी आभार मानून सहकार्य केल्याबद्दल त्यांचे ऋण व्यक्त केले, तसेच त्यांच्या कार्याचा गौरव केला.



## डौली गावामध्ये बिबट्याने वासरू मारले.

केळशी प्रतिनिधी.

दापोली तालुक्यातील डौली गावात बिबट्याची दहशत दिसून येत आहे.

आज दिनांक ४/ ६/२४ रोजी डौली गावातील गावठाण वाडीतील रहिवासी राम गंगाराम गायकवाड, यांच्या गोठ्यात( वाड्यात) बिबट्या शिरून, त्याने वासरू मारले .गायकवाड यांचे नुकसान झाले. कर्तव्यदक्ष पोलीस पाटील रुपेश महाडिक यांनी तात्काळ दापोली वन अधिकारी यांना सूचित करून, सदर घटना त्यांच्या निदर्शनात आणून दिली. पुढील कारवाई वनाधिकारी करत आहेत.



## वाचक लिहितात
## तो सुदिन स्वप्नातच !

प्रतिवर्षाप्रमाणे गणेशोत्सव काळात यंदा एसटी महामंडळाने ४३०० जादा तर रेल्वे प्रशासनाने २० स्पेशल गाड्या चालविण्याची घोषणा केली आहे. असे निर्णय प्रतिवर्ष गणेशोत्सव काळात अथवा सणासुदीला घेतले जातात. मात्र प्रश्न आहे तो, तरीसुद्धा गणेश भक्तांना, कोकणी प्रवाशाला कधी सुखाचा प्रवास लाभल्याचे आठवत नाही. यातायात विना रिझर्वेशन मिळतेच असे नाही. चेंगराचेंगरी, तू तू मैं मैं च्या एकांकिका, तासनतास ठप्प होणारा प्रवास, प्राथमिक गरजांच्या प्रचंड गैरसोयी आदी अनेक समस्यांना दरवर्षी तोंड दिल्याशिवाय प्रवास चुकत नाही हा अनुभव आहे. ज्या दिवशी या कालावधीत कोकणी माणसाचा प्रवास सुखाचा, समाधानाचा, विना सायास होईल तो सुदिन. त्याच सुदिनाची वाट पाहणं हेच कोकणी माणसाच्या नशिबी होय.

विश्वनाथ पंडित
९५८८४५०४४२

छत्रपती संभाजीनगर विभागीय कार्यालय पत्ता : लक्ष्मण फकिरबा कांबळे छत्रपती संभाजीनगर कांचनवाडी संभाजीनगर पत्ता पैठण रोड बेस्ट प्राईस कांचनवाडी डेंटल हॉस्पिटल जवळ (संपादक आवृत्ती), संपर्क : ९०२२६४३७७३ किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )